# ‘मेट्रो ३’ मार्गिकेच्या आसपास वृक्षारोपण करा, एमएमआरसीचे नागरिकांना आवाहन

**मुंबई :** ‘कुलाबा –वांद्रे–सिप्झ भुयारी मेट्रो ३’ मार्गिकेलगतच्या परिसरात वृक्षारोपण करावे असे आवाहन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) नागरिकांना केले आहे. नागरिकांनी लावलेल्या झाडांची तीन वर्ष देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदारावर सोपविण्यात येणार आहे. मेट्रो ३ मार्गिकेच्या कामासाठी ३३.५ किमी परिसरातील झाडे मोठ्या संख्येने कापण्यात आली आहेत. तर आरे कारशेडमधील झाडांची कत्तल तर मोठा वादाचा विषय ठरला आहे. एकूणच मेट्रो ३ मार्गिकेत करण्यात आलेली झाडांची कत्तल लक्षात घेता याची नुकसानभरपाई म्हणून मेट्रो ३ च्या मार्गिकेच्या परिसरात मोठ्या संख्येने झाडे लावण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे.